म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल वाङ्मय
दा. क्र. ५४९९३

# गोष्टींचा तास

BVBK-0404493

तारा


ग्रं. सं. ठाणें

१



BVBK-0404493

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन
गिरगांव, मुंबई




# गोष्टींचा तास

29 JAN 1973

१

लेखक

भालचंद्र महादेव वैद्य

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य तीन आणे

# मुलांनो

गोष्टी आवडत नाहींत कुणाला ? लहानांपासून थोरांपर्यंत नि गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सगळ्यांनाच गोष्टी आवडतात. त्यांतल्या त्यांत तुम्हांला गोष्टींची फारच आवड असते. कोणी गोष्टी सांगत असला, कीं तुम्ही तेथें जमतां. आम्हांला गोष्टी सांगा म्हणून गुरुजींच्या पाठीशीं रोज तुमचा ससेमिरा असतो.

ही तुमची गोष्टींची आवड लक्षांत घेऊन ह्या गोष्टी लिहिल्या आहेत.

ह्या गोष्टींनीं तुमचें मनरंजन होईल असा मला विश्वास वाटतो.

गोष्टींच्या तासाला ह्या गोष्टी वाचल्यात तर दिवसभराच्या अभ्यासाचे श्रम नाहींसे होऊन नवीन काम करण्यास उत्साह वाटेल.

सदैव तुमचाच

**भालचंद्र वैद्य**

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ खोटी गोष्ट | ... | ३ |
| २ आकाशांतलीं फुलें | ... | ४ |
| ३ मुली खोड मोडली | ... | ७ |
| ४ समजुतीचा घोटाळा | ... | १० |
| ५ खोडकर वाळू | ... | ११ |
| ६ वारा नि सूर्य | ... | १४ |
| ७ कोल्होबा | ... | १५ |
| ८ शूर रामजी | ... | १८ |
| ९ चोरटा कोल्हा | ... | १९ |
| १० चोर पकडला | ... | २१ |
| ११ बडबडीचा परिणाम | ... | २४ |


---


प्रथमावृत्ति : १९४२ ; पुनर्मुद्रण : १९४३, १९४५, १९५३

मुद्रक : वा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

१

## खोटी गोष्ट

एक होता मुलगा.
त्याला सापडला हुलगा.
हुलग्याची केली उसळ.
जेवायला आलें मुसळ.

मुसळ झालें खूष.
त्याला भेटली घूस.
घुशीनें केलें बीळ.
बिळांत सांठवले तीळ.
तिळांचें काढलें तेल.
विकून आणले गेंद.
गेंद घातले पायीं.
नटली घूसबाई.
साडी चोळी ल्याली.
दूध साखर प्याली.
बिळांत कांहीं शिरेना.
बाहेर कांहीं निघेना.
घूस फार मोठी.
सारीच गोष्ट खोटी.

१ मुसळ कोणाकडे जेवायला गेलें ? २ घुशीनें काय काय केलें ?

★

## २
## आकाशांतलीं फुलें

देवांचा एक राजा आहे.
त्याचें नांव आहे इंद्र.
त्या इंद्राची एक फार मोठी बाग आहे.

त्या बागेचें नांव आहे नंदनवन.

फार फार जुनी गोष्ट.

त्या वेळीं सगळे देव नंदनवनांत फिरायला येत.

नंदनवनांत खूप फुलझाडें होतीं.

ह्या फुलझाडांवर नेहमींच फुलें असत.

किती सुंदर फुलें.

किती चकचकीत फुलें तीं !

त्या फुलांचे रंग तरी किती गमतीचे !

देवांना फार आवडत तीं फुलें.

पण तीं फुलें कोणाला मिळत नसत.

एकदा चांदोबानें कांहीं फुलें माळ्याजवळ मागितलीं.



माळी म्हणाला, “ इंद्रदेवाकडे जा.
त्यानें सांगितलं तर देतों तुला फुलं.”

चांदोबानें इंद्रदेवाकडे जाऊन फुलें मागितलीं.

इंद्रदेव नंदनवनांत आला. त्यानें बरींच फुलें काढायला सांगितलें माळ्याला.

माळ्यानें परडीभर फुलें काढलीं नि तीं इंद्रदेवापुढें आणून ठेविलीं.

चांदोबाबरोबर सगळे देव फुलें मागायला आले.

जो तो 'मला द्या', 'मला द्या' असें ओरडूं लागला. सगळे इंद्रदेवाभोवतीं जमले.

चांदोबा मात्र बाजूला उभा राहिला होता.

इंद्रदेव म्हणाला, "चंदू, तुला हवींत ना फुलं?"

चांदोबा हसला गालांतल्या गालांत.

इंद्रदेव पण हसला त्याच्याकडे पाहून.

मग इंद्रदेव सगळ्या देवांना म्हणाला,

"तुम्हांला हवींत का फुलं?"

सगळे देव ओरडले, "होय, होय."

सगळ्या देवांनीं एकच गोंधळ माजविला.

इंद्रदेवाला त्या सगळ्या देवांचा राग आला.

तो देवांना म्हणाला, "तुम्ही आहांत भांडोरे. तुम्हांला कांहीं मिळणार नाहीं. आमचा शहाणा चंदू पाहा कसा बाजूला उभा राहिला आहे तो!"

मग इंद्रदेव चंदूला म्हणाला, "चंदू, हीं सारीं फुलं तुलाच घे."

इतकें बोलून इंद्रदेवानें तीं परडीभर फुलें चांदोबाकडे फेकलीं. चांदोबा खुदकन् हसला.

तीं फुलें नेहमीं चांदोबाबरोबर असतात.

आपण त्या फुलांना चांदण्या म्हणतों !

---

१ नंदनवनांत काय होतें ? २ चांदोबानें फुलें मागितल्यावर माळी काय म्हणाला ? ३ देवांना फुलें कां मिळालीं नाहींत ?

★

## ३
## भली खोड मोडली

एक होता कोल्हा नि एक होता कोंबडा. कोल्हा फार खोडकर होता.

तो कोंबड्याला फार त्रास देत असे.

कोंबडा दिसला, कीं कोल्हा त्याच्या पाठीस लागत असे. कोंबडा धावूं लागला, कीं कोल्हा त्याला जास्तच त्रास देई.

कोंबडा ह्या त्रासाला अगदीं कंटाळला.




कोंबड्याला कांहीं सुचेना.

एका कासवाची नि कोंबड्याची मैत्री होती.

कोंबड्यानें कासवाला सगळी हकीकत सांगितली.

कासवानें कोंबड्याला एक युक्ति सांगितली.



मग दुसरे दिवशीं कोंबडा कोल्ह्याकडे जाऊन म्हणाला, " भाऊ, तुला जांभळं आवडतात ना ?

आज संध्याकाळीं माझ्याबरोबर चल. मी तुला पुष्कळ जांभळं देईन. "

संध्याकाळीं दोघे नदीकांठीं गेले. तेथें पाण्याजवळच कासव दगडासारखें बसलें होतें. कोंबडा कोल्ह्याला म्हणाला, "भाऊ, तूं ह्या दगडावर बस. मी वरून जांभळं टाकतों."

कोल्हा कासवाच्या पाठीवर बसला. त्याला वाटलें हा खराच दगड आहे.

मग कोंबडा झाडावर चढला.

इतक्यांत झटकन कासव पाण्यांत शिरलें.

"बुडालों रे बुडालों ! मला वांचवा." असें कोल्हा ओरडूं लागला.

कासव आणखी खोल पाण्यांत जाऊं लागलें. कोल्ह्यानें कोंबड्याला पुन्हा त्रास देणार नाहीं असें कबूल केलें.

तेव्हां कासव हळूच कोल्ह्याला घेऊन परत कांठावर आलें.

कोल्ह्याची चांगलीच खोड मोडली.

१ कोल्ह्याला फसविण्यासाठीं कोंबड्यानें कोणती युक्ति केली ?
२ कोल्ह्यानें काय कबूल केलें ?

★

## ४ समजुतीचा घोटाळा

मधुकर मोठा हुशार मुलगा होता. तो अजून शाळेंत जात नसला, तरी त्याला लिहितां वाचतां येत असे. त्याच्या आईनें त्याला लिहावयास व वाचावयास शिकविलें होतें.

मधुकर पण चौकस असल्यामुळें कांहीं माहिती आईला विचारून रोज लिहीत असे.

आज त्याला बाबांनीं नवी पाटी आणली होती.

नवी पाटी साफसूफ करून झाल्यावर मधुकर आईला म्हणाला, " आई, मला मराठी महिन्यांचीं नांवें सांग. तीं मी माझ्या नव्या पाटीवर लिहिणार आहें."

आई म्हणाली, " ठीक आहे, ऐक."

"चैत्र, वैशाख, ज्येष्ठ,आखाड, श्रावण, भादवा, आश्विन, कार्तिक, मार्गेसर." इतकें झाल्यावर आई कांहीं कामासाठीं स्वयंपाकघरांत गेली.

आई परत आल्यावर मधुकर म्हणाला, "आई, मार्गेसर झाला,पुढें काय ?" आई म्हणाली, " पूस."

हें उत्तर ऐकून मधूनें लिहिलेलें सगळें पुसून टाकलें व मग तो आईस म्हणाला, "आई, पुसलें. आतां काय ?"

आई म्हणाली, "कां पुसलेंस ?"

मधुकर म्हणाला, "तूं पूस म्हणालीस म्हणून."

मधूचें उत्तर ऐकून त्याच्या आईला नि बाबांना खूप हसूं आलें.

१ मधूनें आईला काय सांगितलें ? २ मधूनें पाटी कां पुसून टाकली ?

★

## ५ खोडकर वाल्या

एका रानांत झाडांवर पुष्कळ वानर राहात असत. दिवसभर ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारणें, फळें तोडून खातां येतील तितकीं खाणें व एकमेकांच्या टवाळ्या करणें ह्यांत त्यांचा सारा वेळ जात असे. रात्र झाली, कीं ते सगळे जण एका मोठ्या झाडावर जमत. तेथें त्यांच्या आपण दिवसभर काय काय गमती

केल्या ह्याबद्दल गप्पा चालत. त्यांच्यांत वाळू म्हणून एक मोठा खोडकर वानर होता. तो रोज निरनिराळ्या गमती सांगे. दुसऱ्यांच्या खोड्या काढल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे.

एकदा त्यानें बरेच कच्चे आंबे काढले व तो ते ज्याच्या त्याच्या अंगावर फेकूं लागला. कोणाला आंबा लागतांच वाळू जोरानें हसे. अशी सगळ्यांची चेष्टा करीत असतां त्याला एक मधमाश्यांचें पोळें दिसलें. ह्या माश्यांची जरा गंमत करावी, म्हणून त्यानें एक आंबा जोरानें त्यांच्या पोळ्यावर मारला. तों सगळ्या माशा त्याच्या अंगावर घोंघावत आल्या व त्याला कडकडून चावल्या. त्याला पळतां पळतां नकोसें झालें. त्याचें अंग खरचटलें. त्याची चांगलीच खोड मोडली. त्या दिवसापासून वाळूनें आपली वागणूक सुधारली.

---

१ वाळू दिवसभर काय करीत असे ? २ वाळूची खोड्या करण्याची संवय कशी गेली ?



## ६

## वारा नि सूर्य

एकदा काय झालें, वारा नि सूर्य ह्यांचें लागलें भांडण. वारा म्हणाला, "मी मोठा आहें. माझा उपयोग किती आहे लोकांना म्हणून सांगूं. मी जर नसलों तर लोक मला पंखे घेऊन मुद्दाम बोलावतात. रात्रीं काय नि दिवसा काय, माझी फारच गरज असते लोकांना. तूं कसला द्वाड, त्रास देतोस सगळ्यांना. सकाळीं उगवल्यावर तूं मुद्दाम किलकिले डोळे ठेवतोस. लोक ह्या तुझ्या लबाडीमुळें फसतात आणि मग तूं एकदम डोळे उघडतोस. तूं डोळे मोठे केलेस, कीं लोक तुझ्या त्रासाला कंटाळून आपापल्या घरांत जाऊन बसतात. तुला त्यांच्या घरांत कुठें जातां येतें ? मी बघ कुठेंही जातों. पण लोकांना नेहमीं त्रास देत नाहीं. लोक माझी किती वाहवा करतात."

हें वाऱ्याचें बोलणें ऐकून सूर्य खूपच रागावला. तो म्हणाला, " माझी थट्टा करून मला हसायला

तुला लाज कशी नाहीं वाटत ? चल हो चालता इथून !" इतकें बोलून सूर्यानें रागानें डोळे वटारले. वाऱ्याला त्याची फारच भीति वाटली नि तो पळत सुटला. सूर्य त्याच्या पाठीस लागला. ते अजून सारखे धावत आहेत पण अजून सूर्याला वारा कांहीं सांपडला नाहीं ! !

१ वाऱ्यानें सूर्याला काय सांगितलें ? २ सूर्य कां रागावला ? ३ सूर्य रागावल्यावर त्यानें काय केलें ?

★

## ७
## कोल्होबा

एक होता कोल्हा.
त्याला फार भूक लागली होती.

फिरतां फिरतां रानांत एक मेलेला बैल त्याला दिसला.

इतक्यांत तेथें एक सिंह आला.

हा आतां बैलाचें मांस खाणार, असें कोल्ह्याला वाटलें.

मग तो सिंहासमोर आला व सिंहास म्हणाला,

" महाराज, हा मेलेला बैल आहे. ह्याचें मांस आपण खाणें बरोबर होणार नाहीं. आपण एखादें जनावर मारून त्याचें ताजें मांस खावयाचें."

हें कोल्ह्याचें बोलणें ऐकून सिंह निघून गेला.

मग कोल्हा बैलाचें पोट फोडूं लागला, पण कातडें जाड असल्यामुळें त्याला तें फाटेना.

तोंच एक वाघ आला.

आतां हें मांस वाघ नक्की खाणार हें पाहून कोल्ह्याला वाईट वाटलें.

वाघ मांस खाण्यासाठीं बैलाजवळ येतांच कोल्हा पुढें येऊन म्हणाला,

" अहो वाघोबा, हें तुम्हीं काय चालवलं आहे ? तुम्हांला मरायचं का आहे ?"

ह्यावर वाघ म्हणाला, " म्हणजे काय ?"

कोल्हा म्हणाला,

" हा बैल आतांच सिंहमहाराजांनीं मारला आहे. ते मला इथें राखण ठेवून गेले आहेत. त्यांनीं तुला पाहिलं तर तुझं काय होईल ?

पण तुला फारच भूक लागली असेल, तर सिंह येईपर्यंत थोडं मांस खा. सिंह येतांच मी ओरडेन. मग तूं पळून जा."



वाघाला कोल्ह्याचें बोलणें पटलें.

त्यानें बैलाचें पोट फाडण्यास सुरुवात केली.

बैलाचें पोट फाटलेलें पाहून कोल्हा ओरडला, "वाघोबा पळ, सिंह आला." वाघ मांस न खातांच पळून गेला.

मग कोल्ह्याची चंगळ उडाली.

---

१ कोल्ह्यानें सिंहाला काय सांगितलें ? २ वाघ मांस खाणार असें पाहून कोल्ह्यानें त्याला काय सांगितलें ?

★

## ८
## शूर रामजी

एका गांवांत रामजी नांवाचा एक शेतकरी राहात असे. तो रोज सकाळीं आपल्या शेतावर जाई; तेथें दिवसभर काम करून संध्याकाळीं परत येई. त्याच्याबरोबर त्याची बायकोदेखील शेतावर जात असे.

त्याच्या शेताकडे जाण्याचा रस्ता दाट जंगलांतून होता. पण रामजी मोठा धीट असल्यामुळें त्याला रानांतून जाण्यास कधीं भीति वाटत नसे.

एके दिवशीं तो व त्याची बायको अशीं दोघें शेतावर जात होतीं. अर्धा रस्ता चालून झाल्यावर रानांतून एक भला मोठा वाघ रामजीच्या अंगावर ओरडत धावून आला. रामजी धीट होता. झटकन त्यानें आपलें मुंडासें हाताला गुंडाळून तो हात वाघाच्या जबड्यांत दिला व दुसऱ्या हातानें वाघाचे पाय दाबून धरले. रामजीची बायकोपण मोठी हुशार होती. तिनें झटकन रामजीच्या कमरेचा

कोयता काढून तो वाघाच्या मानेवर जोरानें मारला. लागलीच वाघ मरून पडला.

ही गोष्ट गांवकऱ्यांना समजली. त्यांना रामजीच्या व त्याच्या बायकोच्या धीटपणाबद्दल मोठें कौतुक वाटलें. त्यांनीं ह्या शूरपणाबद्दल रामजी व त्याची बायको ह्या दोघांना बक्षीस दिलें.

१ रामजी रोज कोठें जात असे ? २ त्याचें शेत कोठें होतें ? ३ गांवकऱ्यांनीं रामजीला कां बक्षीस दिलें ?

★

## ९

## चोरटा कोल्हा

एक होता शेतकरी. त्याचा एक उसाचा मळा होता.

त्या मळ्याच्या शेजारींच मोठें रान होतें.

त्या रानांत एक कोल्हा राहात होता.

कोल्हा रोज रात्रीं मळ्यांत येई व उसाची नासाडी करी. उसाची नासाडी कोण करतो हें शेतकऱ्याला कळेना. तो रात्रंदिवस तेथें मळा

राखीत बसे, पण रात्रीच्या वेळीं काळोखांत चोर कोठून येतो हें त्याला कांहीं कळेना.

शेवटीं चोर पकडण्याची त्यानें एक छानदार युक्ति शोधून काढली. त्यानें एक मोठें थोरलें बाहुलें तयार केलें. त्या बाहुल्याच्या गालांना खूप फणसाचा चीक लावून तें बाहुलें मळ्यांत उभें करून ठेवलें.

रात्र पडतांच रोजच्याप्रमाणें कोल्हा ऊस खाण्यासाठीं मळ्यांत आला. हें बाहुलें पाहून पहिल्यानें तो जरा घाबरलाच, पण त्याची कांहीं हालचाल नाहींसें पाहून तो त्या बाहुल्याजवळ गेला. मग त्या बाहुल्यास तो म्हणतो, "काय रे, तूं कोण आहेस ? बोल लवकर, नाहींतर थोबाडींत खाशील !" तें बाहुलें थोडेंच बोलणार ! तें कांहीं उत्तर देत नाहींसें पाहून कोल्ह्यानें बाहुल्याच्या एक थोबाडींत मारली. तों त्याचा पाय चिकटून अडकला. तेव्हां कोल्ह्याला जास्तच राग आला आणि त्यानें दुसऱ्या पायानें बाहुल्याच्या दुसऱ्या

थोबाडींत जोरानें चपराक मारली. तों दुसरा पायही अडकला. तेव्हां कोल्ह्याची पाय सोडवून घेण्यासाठीं धडपड सुरू झाली. शेतकरी जवळच हातांत दांडा घेऊन बसला होता, त्यानें ही धडपड ऐकली व तेथें येऊन कोल्ह्याला चांगला खरपूस मार दिला.

---

१ मळ्यांत कोणीं येऊं नये म्हणून शेतकऱ्यानें काय केलें ? २ बाहुलें पाहून कोल्हा काय बोलला ? ३ कोल्ह्याचे पाय कां चिकटले ?

★

## १० चोर पकडला

दिवाळी जवळ आली होती. दिनूच्या आईनें पुष्कळ लाडू केले होते.

दिनूला आईनें एक लाडू दिला. तो त्याला फारच आवडला.

त्याला आणखी एक लाडू हवा होता.

संध्याकाळीं आईनें सगळे लाडू डब्यांत भरून स्वयंपाकघरांत शिंक्यावर ठेवून दिले.

रात्र झाली. नऊ वाजले. आई निजली, बाबा निजले, घरांतलीं सगळीं माणसें झोपीं गेलीं. दिनूला मात्र आज अजून झोप आली नव्हती. तो हळूच उठला. पाय न वाजवितां स्वयंपाकघरांत गेला. दिवा अगदीं बारीक होता. दिनूला शिंकें दिसलें, पण हात कसा पोंचणार ? त्यानें हळूच पायांखालीं दोन डबे घेतले व शिंक्यापर्यंत हात तर पोंचविलाच. इतक्यांत खाड् खाड् असा जोराचा आवाज झाला. मनीनें उंदीरमामावर झडप घातली होती. दिनू घाबरून खालीं पडला. आई धावत आली, बाबाही धावत आले, सगळीं जणं स्वयंपाकघरांत जमलीं. मग दिनूची चांगलीच फजिती झाली. सगळीं म्हणालीं, " भला चोर पकडला. "

---

१ लाडू कोठें ठेविले होते ? २ लाडू मिळण्यासाठीं दिनूनें काय केलें ? ३ दिनू कां घाबरला ?



## ११ बडबडीचा परिणाम

एक होती म्हातारी. ती एका गांवांत राहात असे.

तिला बडबड करण्याची फार सवय होती.

म्हातारीचें लहानसें घर होतें.

त्या घरांत ती एकटीच राहात असे.

म्हातारीजवळ बरेच पैसे होते.

ते पैसे तिनें घरांत पुरून ठेविले होते.

कांहीं चुलीपाशीं होते.

कांहीं देवघरांत होते.

कांहीं उखळीखालीं होते.

एकदा काय झालें, रात्रीं म्हातारीच्या घरांत शिरले चोर.

म्हातारी घाबरली नि ओरडूं लागली.

मग एक चोर म्हातारीला दरडावून म्हणाला, "म्हातारे, ओरडलीस तर आम्ही तुला मारूं.

उगीच ओरडूं नकोस. तुझे पैसे कोठें आहेत तें निमूटपणें सांग."



म्हातारी कांपत कांपत म्हणाली, "अरे बाबांनो, चुलीपुढें पुरलेलें आहे तें न्या. पण देवघराजवळचें असूं द्या."

चोरांनीं चुलीपुढचे नि देवघराजवळचे पैसे काढले. तें पाहून म्हातारी म्हणते, "बरें. आतां उखळीखालचें आहे, तें तरी मला ठेवा." चोरांनीं लागलीच उखळीखालचे पैसे काढले.

म्हातारी सारखी बडबड करीत होती. ती चोरांना म्हणाली, "बाबांनो, आतां निदान पडवींतील दगडाखालचे तरी नेऊं नका. आतां तेवढेच पैसे राहिले आहेत."

चोरांनीं पडवींतले पैसेदेखील लांबविले.

सगळे पैसे घेऊन चोर पळून गेले.

म्हातारीच्या बडबडण्यामुळें चोरांना सगळ्या जागा समजल्या.

सगळे पैसे गेले म्हणून शेवटीं म्हातारी दुःख करीत बसली.

हा सगळा बडबडीचा परिणाम !

---

१ म्हातारीला कोणती संवय होती ? २ म्हातारी बडबडत राहिल्यामुळें काय झालें ? ३ चोरांनीं म्हातारीला काय विचारलें ?

[library stamp, handwritten number ४४८३, ७१-७१]